निशाणी क.०१ खाली

# न्यायनिर्णय

(दिनांक २७/०६/२०२५ रोजी घोषित)

आजरोजी आरोपीस पुकारले असता, आरोपी माझ्यासमक्ष हजर राहिला. आरोपीस त्याचे नाव व पत्ता याबाबत विचारणा केली असता, आरोपीने दोषारोपपत्राप्रमाणे नाव व पत्ता सांगितला. आरोपीस त्याच्यावरील दोषारोप वाचून व समजावून सांगितला असता आरोपीने सदरील गुन्हा कबूल असल्याचे सांगितले. आरोपीने गुन्हा कबूल असलेबाबत (निशाणी क.०२) पुरसीस दाखल केली. आरोपीचे गुन्हा कबूली बाबतचे निवेदन (निशाणी क.०३) वर नोंदविण्यात आले आहे. आरोपीस तालुका विधी सेवा समिती मार्फत विधीज्ञ पुरविण्याबाबत विचारणा केली असता आरोपीने त्यास नकार दिला. आरोपीतर्फे दाखल करण्यात आलेल्या कागदपत्रांचे अवलोकन केले असता, आरोपीकडून सदरील कृत्य अनावधानाने घडलेले आहे. आरोपीचे वय, आरोपी स्वेच्छेने गुन्हा कबूल करीत असल्याने आरोपीस सुधारण्याकरिता संधी देण्याची बाब, आरोपीवरती अवलंबून असलेले त्याचे कुटूंबीय व आरोपीचे भविष्य, गुन्हयाचे स्वरुप, रेल्वे बोर्ड यांच्याकडील Standing Order No.111, Railway Protection Force, Crime Manual, Chapter-5, Para 1.10(i) मधील तरतूद, प्रस्तूत फिर्याद, प्रस्तूत प्रकरणी आरोपीतर्फे दाखल करण्यात आलेली कागदपत्रे या सर्व बाबींचा सारासार विचार करुन मी पुढीलप्रमाणे आदेश पारीत करीत आहे.:-

## आदेश

०१. प्रस्तूत प्रकरणी आरोपीस भारतीय नागरिक सुरक्षा संहिता, २०२३ कलम २७५ अन्वये दोषी ठरविण्यात येत आहे.

०२. आरोपीस प्रस्तूत प्रकरणी दंड रु.२००/- इतकी द्रव्यदंडाची शिक्षा ठोठाविण्यात येत आहे. आरोपीने दंड न भरल्यास १० दिवस साध्या कैदेची शिक्षा ठोठाविण्यात येत आहे.

०३. आरोपीने दंड भरल्यास आरोपीस तात्काळ सोडण्यात यावे.

०४. प्रस्तूत प्रकरणात आरोपीकडून मुद्देमाल जप्त केला असल्यास सदर मुद्देमाल दंडाची रक्कम भरल्यानंतर आरोपीस तात्काळ परत देण्यात यावा व त्याबाबत संबंधीत रेल्वे सुरक्षा बल यांना रितसर कळविण्यात यावे.

०५. आरोपीला न्यायनिर्णयाची एक प्रत विनामुल्य देण्यात यावी.

(न्यायनिर्णय खुल्या न्यायदान कक्षात घोषीत करून संगणकमुद्रीत करण्यात आला.)

( पी. पी. बागुल )
प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी,
लोहमार्ग न्यायालय, विरार

वसई रोड
दिनांक : २७/०६/२०२५